लोकमत पु. पान क्र. 1

सहा जागांवर कोण कुणाविरुद्ध लढणार?

# तीन उमेदवार ठरले, अन्य उमेदवारांची प्रतीक्षा

जगदीश भोवड

लोकमत न्यूज नेटवर्क

वसई : विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर पालघर जिल्ह्यातील विधानसभेच्या सहा जागांवर कोण कुणाविरुद्ध लढणार, याची चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील तीन उमेदवारांची नावे जाहीर झाली असून, अन्य उमेदवारांची मतदारांना प्रतीक्षा आहे. भाजपने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत नालासोपारा येथील जागेवर आपला उमेदवार जाहीर केला आहे, तर बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा आ. हितेंद्र ठाकूर यांनी वसईतून आपली स्वतःची उमेदवारी जाहीर केली आहे, तसेच डहाणू विधानसभा मतदारसंघात माकपाने आमदार विनोद निकोले यांनाच पुन्हा संधी दिली आहे.

लोकमत सुपर Vote

- या तीन उमेदवारांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पक्षांनी आपले उमेदवार जाहीर केलेले नाहीत. त्यामुळे या उमेदवारांची उत्सुकता साऱ्यांनाच लागून राहिली आहे.
- बविआचे सर्वेसर्वा आ. हितेंद्र ठाकूर यांनी मागील निवडणुकीच्या वेळी मी पुन्हा उभा राहणार नाही, असे म्हटले होते.
- यामुळे त्यांच्या वसईच्या जागी ते आपली पत्नी, माजी महापौर प्रवीणा ठाकूर यांना उमेदवारी देतील, अशीही चर्चा सुरू होती.
- रविवारी कार्यकर्त्यांनी वसईतून त्यांनीच उभे राहावे, असा आग्रह धरल्यानंतर हितेंद्र ठाकूर यांनी आपली उमेदवारी जाहीर करून टाकली.



हितेंद्र ठाकूर



विनोद निकोले



राजन नाईक

- नालासोपाराचे आमदार क्षितिज ठाकूर व बोईसरचे आमदार राजेश पाटील यांच्याबाबत त्यांनी कोणतेही भाष्य केले नाही. असे असले तरी या दोघांचीही उमेदवारी पक्की समजली जात आहे. हितेंद्र ठाकूर यांनी जिल्ह्यातील सहाही जागांवर लढणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे त्यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणकोण उमेदवार असणार याची चर्चा सुरू झाली आहे.
- महायुती आणि महाआघाडीच्या उमेदवारांविषयीही उत्सुकता आहे. महायुतीतील भाजपने नालासोपाऱ्यात राजन नाईक यांची उमेदवारी जाहीर केली असली तरी अन्य पाच जागी कोण उमेदवार असणार याची उत्सुकता आहे. महाआघाडीचेही उमेदवार जाहीर व्हायचे बाकी आहेत. आघाडीतून डहाणूची जागा विद्यमान आमदार विनोद निकोले यांच्यासाठी सोडली जाणार आहे.

## दुचाकीस्वारावर गुन्हा दाखल




नालासोपारा : चंदनसार रोडवरील मॅकविन टॉवरमध्ये राहणारे राधेश्याम चौरसिया (वय ५६) यांच्या मृत्यूप्रकरणी दुचाकी चालकावर फेटलचा गुन्हा रविवारी दाखल झाला आहे. गोकुळवाडी येथे राहणारे आत्माराम पाटील आणि राधेश्याम चौरसिया (५६) हे दोघे दुचाकीवरून वैतरणावरून कन्हेर बाजूकडे येत होते. त्यावेळी त्यांची दुचाकी दहिसर स्मशानभूमीसमोर दगडावरून स्लिप होऊन राधेश्याम हे जखमी झाले होते. त्यावेळी आत्माराम पाटील यांनी त्यांना उपचाराकरिता हॉस्पिटलमध्ये घेऊन न जाता गोकुळवाडी येथील गाव्यात सोडून तेथून निघून गेले. त्यामुळे राधेश्याम यांना उपचार वेळेवर न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. विरार पोलिसांनी तपासात ही हकीकत उघड केल्यावर गुन्हा मांडवी पोलिसांकडे वर्ग केल्यावर मांडवी पोलिसांनी रविवारी दुचाकी चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

## चाकूचा धाक दाखवून लुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारच्या गडगापाडा येथील महादू भोये (वय ३५) यांना चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना घडली आहे. विरार पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

महादू यांच्यासह चार आरोपी कारने प्रवास करीत होते. आरोपींनी त्यांची बॅग हिसकावून घेत एकाने त्यांच्या मोबाइलमधील जीपे ॲप उघडून चाकूचा धाक दाखवून पासवर्ड विचारला. त्यांचा मोबाइल, पाकीट व ब्लूटूथ जबरदस्ती काढून घेतले. महादू यांना मारहाण करून रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास पिरकुंडा दर्गा येथे गाडीतून उतरविले. चारही आरोपी कारमधून विरार फाट्याच्या दिशेने पळून गेले.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु. पान क्र. 1

## तुळींजमध्ये कार चोरीला

नालासोपारा : विजयनगरच्या प्रभावती नानू चाळ येथे राहणाऱ्या राहुल सालियन (वय २७) या तरुणाची साडेचार लाख रुपये किमतीची इको कार चोरीला गेली आहे. त्याने शनिवारी रात्री विजयनगरच्या आमंत्रण बार जवळील सार्वजनिक रस्त्यावर कार पार्किंग करून ठेवली होती. अज्ञात चोरट्याने पार्किंग केलेली कार चोरून नेल्याने तुळींज पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला आहे.

## गळ्यातील रोझरी खेचली



नालासोपारा : वसईच्या ओमनगर येथील इस्कॉन हाइट्स या इमारतीत राहणाऱ्या रोझा वरीद (वय ६१) यांच्या गळ्यातून १८ ऑक्टोबरला मॉर्निंग वॉकला जाताना रोझरी खेचण्याचा प्रयत्न झाला आहे. स्मार्ट सिटीसमोरील वसई वन बिल्डिंगच्या येथे दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी पाठीमागून येऊन त्यांच्या गळ्यातील सोनेरी रंगांची रोझरी खेचण्याचा प्रयत्न केला व दुचाकीवरून पळून गेले. माणिकपूर पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पु. पान क्र. 3



## आचारसंहितेच्या उल्लंघनाची ॲपवर करा तक्रार

लोकमत न्यूज नेटवर्क

वसई : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सामान्य नागरिकांना थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने सी व्हिजिल सिटीझन ॲप विकसित केले आहे. यात दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत कारवाई केली जाणार आहे.

अनेकदा आचारसंहितेचे राजकीय कार्यकर्ते व नेते यांच्याकडून उल्लंघन होत असते; मात्र, कुठे तक्रार करायची हे माहीत नसते. या ॲपमुळे आता तक्रार करता येईल. आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करू नये याविषयी निवडणूक लढविणारे उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, आचारसंहितेचे उल्लंघन होते. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी-व्हिजिल ॲप विकसित केले आहे. या ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पृ. पान क्र. १

# भाजपात तिकीट मिळवण्यासाठी रस्सीखेच

## महायुतीमधील अंतर्गत वाद पेटण्याची शक्यता

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर सर्वच पक्षांमधील अंतर्गत वाद,सलोखा आदी समोर येत असतानाच मिरा भाईंदर १४५ विधानसभा क्षेत्रात भाजपकडून उमेदवारी पदरात पाडून घेण्यासाठी माजी आ. नरेंद्र मेहता व आ. गीता जैन यांच्यात स्पर्धा सुरु झाली आहे.नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात भाजप तर्फे उमेदवार म्हणून माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या नावाची घोषणा झाल्याचे समोर आले आहे.भाजपात तिकीट मिळवण्यासाठी रस्सीखेच आहे. त्यामुळे महायुती मधील अंतर्गत वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जैन यांचा कार्यक्रम भाईंदर पश्चिमेकडील अग्रवाल ग्राउंड मध्ये प्रामुख्याने रिक्षा चालकांसाठीच आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी शहरातील ३० ते ४० टक्के रिक्षाचालकांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. तर मेहता यांनी प्रख्यात कथाकार जया किशोरी यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करून शहरातील श्रद्धाळू मतदारांना भक्तिमय वातावरणात न्हाऊन काढले. त्यांनी जैन यांची संभाव्य उमेदवारी कापण्यासाठी मिरा-भाईंदर मतदार संघातून भाजपच्याच तिकिटावर निवडणूक लढविण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरु केले आहेत. तत्पूर्वी जैन यांनी १९ ऑक्टोबर रोजी आयोजित कार्यक्रमात उपस्थित रिक्षा चालकांना भेटवस्तू दिल्याचे समोर आले. मात्र त्यावर निवडणूक प्रशासनाच्या भरारी पथकाकडून कोणतीही दखल घेण्यात आली नाही. दरम्यान उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच मेहता व जैन यांच्यात उमेदवारी मिळविण्यासाठी स्पर्धा सुरु झाली असून त्यात मतदारांचे मात्र चांगभलं होऊ लागल्याचे दिसून येत आहे. उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच मेहता व जैन यांच्यात उमेदवारी मिळविण्यासाठी स्पर्धा सुरु झाली असून त्यात मतदारांचे मात्र चांगभलं होऊ लागल्याचे दिसून येत आहे.मेहता व जैन यांनी उमेदवारी मिळण्याची आशा मात्र कायम ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे.

**• भाजपाकडे असलेल्या मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघावर यंदा शिंदेंच्या शिवसेनेने दावा केला आहे. त्यातच भाजपने रविवारी ९९ उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर केली. त्यात मिरा-भाईंदर मतदार संघाचा उल्लेखच नसल्याने या मतदार संघातून कोणाला तिकीट मिळणार तसेच हा मतदार संघ भाजपकडेच राहणार कि शिवसेनेकडे जाणार, यावर अटकळ केली जात आहे. या जरतरच्या राजकारणाकडे कानाडोळा करून मेहता व जैन यांची मात्र भाजपकडून उमेदवारी मिळविण्यासाठी स्पर्धा सुरु केल्याचे स्पष्ट झाले आहे.यांनी २००४ साली महापालिकेचा कारभार हाताळला होता. मात्र गेल्या काही वर्षांपासून त्यांनी सक्रिय राजकारपासून अंतर ठेवले होते.**

पुढारी पृ. पान क्र. ३

# भाईंदरच्या नगरभवन तलावात मृत माशांचा खच

## तलावात पीओपी मूर्त्या विसर्जन केल्याने पाणी दूषित

- **पर्यावरण विभागाच्या आदेशाकडे मनपाचे दुर्लक्ष**
- **योग्य त्या कारवाईची पर्यावरणप्रेमींची मागणी**



**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पश्चिमेच्या नगरभवन तलावात गणेश उत्सव व नवरात्री उत्सवा दरम्यान शासनाने बंदी घातलेल्या पीओपी मुर्त्यांचे विसर्जन केल्यामुळे पाणी दूषित व हिरवे झाले असुन परिसरात मोठी दुर्गंधी पसरली आहे. या दूषित पाण्यामुळे जलचर प्राणी व मासे यांचा मोठया प्रमाणात मृत्यू झाला आहे. मृत्यु झालेले मासे तलावात तरंगत आहेत. महापालिकेकडून मृत्यु झालेले मासे बाहेर काढून त्याचा ढिगारा घातला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश आणि पर्यावरण विभागाचे आदेश डावलून याकडे दुर्लक्ष केले आहे. याप्रकरणी संबधीतांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी पर्यावरण प्रेमी यांनी केली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने व शासनाच्या पर्यावरण विभागाने नैसर्गिक व सार्वजनिक तलावात बंदी असलेल्या पीओपीच्या देवी देवतांच्या मुर्त्या विसर्जित करू नये, त्यासाठी दुसरीकडे कुत्रीम तलाव बांधून त्यामध्ये मुर्त्या विसर्जित कराव्यात व त्याचा मलबा काढून पालिकेने त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावावी असे आदेश आहेत. महापालिकेने या आदेशाचे उल्लंघन करून माती व शाडूच्या मुर्त्यांसोबत सरसकट पीओपी मूर्त्या व त्यासोबत असलेले केमिकल युक्त साहित्य तलावात विसर्जन केले. त्यामुळे तलावातील पाणी दूषित व हिरवेगार झाले असुन मोठया प्रमाणात माशांचा मृत्यु झाला आहे. आजूबाजूच्या परीसरात या दुर्गंधी युक्त पाण्याचा वास सुटला आहे. अशीच परिस्थिती शिवार गार्डन ईतर परीसरात देखील झाल्याचे सांगितले जात आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

अशा पद्धतीने नैसर्गिक तलाव पात्रातल्या माशांचा मृत्यू होत आहे. याप्रकरणी संबंधित पालिकेचे अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई करावी व दोषी असलेल्या पालिका अधिकाऱ्यांवरही गुन्हा दाखल करण्याची मागणी पर्यावरण प्रेमी पिरज पाव यांनी केली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पृ. पान क्र. 4

# शहर राजकीय फलकमुक्त

## वसई-विरारमध्ये आचारसंहितेमुळे फलकांवर कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १५ ऑक्टोबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर वसई-विरार भागात राजकीय पक्षांची भित्तीपत्रके, फलक व झेंडे काढण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. दोन दिवसांत पालिकेने ४ हजारांहून अधिक राजकीय फलक भित्तीपत्रक, झेंडे हटवले आहेत. राजकीय फलक हटवल्याने शहर आता राजकीय फलकमुक्त झाल्याचे चित्र दिसून येत आहे.



वसई-विरार शहरातील विविध ठिकाणी राजकीय दौरे, अभिष्टचिंतन, शुभेच्छांसह इतर कारणांतून नेतेमंडळींसह पदाधिकाऱ्यांनी राजकीय पक्षांचे फलक लावले होते. तर काही ठिकाणी विना परवानाच फलक लावण्यात आले होते.

विशेषतः गणेशोत्सव व नवरात्री या काळात मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षांकडून फलकबाजी झाली होती. उत्सव संपला तरीही हे फलक काढले गेले नव्हते. निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू केल्यानंतर वसई-विरार महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाने सार्वजनिक ठिकाणी असणारे राजकीय फलक, भित्तीपत्रके, झेंडे काढण्याचे काम युध्दपातळीवर सुरू केले. प्रभाग निहाय या कारवाया सुरू करण्यात आल्या आहेत. याशिवाय विविध नोटीसा काढून राजकीय फलक व भित्तीपत्रके काढून टाकण्याच्या सूचना पालिकेने दिल्या आहेत.

### कारवाई सुरूच

वसई-विरारमध्ये जागा मिळेल त्या ठिकाणी राजकीय पक्षांचे व त्यांच्या नेते कार्यकर्ते यांचे फलक झळकत होते. विशेषतः कोणत्याही परवानग्या न घेताच विद्युत खांब, उड्डाणपूल, चौक यासह इतर सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आले होते. सण उत्सव निघून गेले तरीही ते फलक काढून टाकण्याकडे दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण झाल्याचे चित्र होते. तर काही फलक मार्गावर लोंबकळत होते त्यामुळे अपघात होण्याचा धोका होता. आता आचारसंहितेमुळे फलक काढून टाकण्यात आल्याने शहर राजकीय फलकमुक्त झाले आहे. दरम्यान आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी विविध ठिकाणी फलक हटविण्याची मोहीम सुरूच असल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त समीर भूमकर यांनी दिली आहे.

लोकसत्ता पृ. पान क्र. 1

# बेकायदा जाहिरातबाजी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरात बेकायदा जाहिरातबाजी करणाऱ्यांवर अखेर महापालिकेने कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. या संदर्भात अतिक्रमण विभागामार्फत मागील तीन दिवसांत एकूण १७ गुन्हे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत.

महापालिकेने शहरातील बेकायदा जाहिरात बंदीवर रोख आणण्याचा ठराव मंजूर केला आहे. जाहिरातीसाठी प्रशासनाने उपलब्ध करून दिलेले जाहिरातफलक व बस थांब्याचा वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र तरी देखील शहरातील झाडांवर तसेच विजेच्या खांब्यावर बेकायदा जाहिरातबाजी सुरू असते. अशा फलकांवर कायदेशीर गुन्हे दाखल करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने महापालिकेला दिले आहेत. परंतु अनेक वेळा तक्रारी आल्यानंतरही प्रशासन याकडे दुर्लक्षपणा करत आले आहे. दरम्यान मागील आठवड्यात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता घोषित करण्यात आली आहे. त्यामुळे राजकीय पक्षाचा प्रचार-प्रसार नियंत्रणात आणण्यासाठी महापालिका खडबडून जागे झाले आहे. त्यामुळे मागील तीन दिवसांत शहरात लावले जाणारे बेकायदा जाहिरात फलक काढले जात आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पान क्र. ३

# शिक्षिकेच्या मारहाणीत विद्यार्थिनीला दुखापत

## १० वर्षांच्या चिमुकलीची मृत्यूशी झुंज

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** क्षुल्लक कारणांवरून खासगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षिकेने १० वर्षांच्या मुलीच्या कानाखाली मारल्याने ती गंभीर जखमी झाली आहे. तिच्या श्वसननलिकेसह मेंदूला इजा झाली असून तिच्यावर मुंबईच्या खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहे. मागील ८ दिवसांपासून ती कृत्रिम श्वसनयंत्रणेवर (व्हेंटिलेटवर) मृत्यूशी झुंज देत आहे.



नालासोपारा पूर्वेच्या ओस्वाल नगरी येथील अंबाराम पटेल (३२) हे किराणा दुकान चालवतात. त्यांची १० वर्षांची मुलगी दीपिका ५ व्या इयत्तेत शिकते. याच परिसरात असलेल्या रिना क्लासेसमध्ये दीपिका खासगी शिकवणीसाठी जाते. ५ ऑक्टोबर रोजी ती वर्गात मस्ती करत असल्याने शिकवणी घेणारी शिक्षिका रत्ना सिंग (२०) हिने दीपिकाच्या उजव्या कानाखाली हाताने जोरदार थप्पड मारली. यामुळे तिच्या कानातील कर्णफुलाचा मागील भाग कानाच्या पाठीमागील बाजूस लागून दुखापत झाली. या मारहाणीमुळे दीपिकाचे तोंड बंद झाले आणि कान सुजून दुखत होता. सुरुवातीला तिला विरारच्या खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. मात्र, दुखणे वाढल्याने तिला १३ ऑक्टोबर रोजी मुंबईच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सामना पान क्र. 6

# महिलांवरील अत्याचाराविरोधात शिवसेना आक्रमक

भाईंदर, दि. २१ (सा. वा.) – मीरा-भाईंदर शहरासह राज्यभरात महिलांवरील अत्याचारात मोठी वाढ झाल्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडी आक्रमक झाली आहे. महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांवर कठोर कारवाई करण्याची मागणी मीरा-भाईंदर जिल्हा महिला आघाडीने पोलिसांकडे केली आहे.

महिलांवरील अत्याचाराच्या घटना शहरात मोठ्या प्रमाणात वाढत चालल्या आहेत. राज्यात प्रत्येक तासात महिलांवरील अत्याचाराच्या पाच घटना घडत आहेत. २०२३ मध्ये राज्यात ७ हजार ५२१ महिलांवर बलात्कार झाला. मुंबई शहरात बाललैंगिक अत्याचाराचे मे महिन्यात सुमारे ५०९ गुन्हे नोंद झाले आहेत. गुन्ह्यांचे हे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी महिला आघाडीच्या

**मीरा-भाईंदरमध्ये पोलीस ठाण्यावर धडक**



संपर्कप्रमुख रोशनी गायकवाड आणि जिल्हा संघटक नीलम ढवण यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांनी शहरातील सर्वच पोलीस ठाण्यांवर धडक दिली. याप्रसंगी उपजिल्हा संघटक सुप्रिया घोसाळकर, प्राची सिंह-पाटील, अनिता रहाडे, क्षमा गांधी, शहर संघटक श्रेया साळवी, शिवानी देसाई, मनीषा भोपळे, कल्पना शिगवण, उपशहर संघटक चेतना महाकाळ, मीलन देसाई, स्नेहल मोरे, रश्मी महाडिक, विभाग संघटक रूपा कनोजिया, स्नेहल दळवी, सुशिला मेडगे, दीपाली गोळे, प्रविणा शिंदे, विभागप्रमुख शेखर पाटील, उपविभागप्रमुख संतोष पाडले, शाखाप्रमुख अमित सोनावणे आदी उपस्थित होते. दरम्यान महिलांवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना पाठीशी घालू नये, अशी मागणी जिल्हा संघटक नीलम ढवण यांनी व्यक्त केली आहे.

Scanned with OKEN Scanner

म. टा. पु. पान क्र. १

# संकल्पसभेतून शक्तिप्रदर्शन

## नरेंद्र मेहता यांची उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच कार्यकर्त्यांची जमवाजमव

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरमध्ये भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहतांकडून संकल्प सभेच्या आडून रविवारी मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले. यावेळी मेहतांना साथ देण्याची भूमिका त्यांना उमेदवारी जाहीर होण्यापूर्वी कार्यकर्त्यांकडून मांडण्यात आली. मोठ्या आत्मविश्वासाने मेहता निवडणुकीच्या तयारीला लागले असले, तरी मिरा-भाईंदरच्या जागेसाठी महायुतीतुन अनेक जण इच्छुक आहेत. त्यामुळे तिकीटआणि जागा नेमकी कोणाला मिळणार ,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मिरा-भाईंदर च्या जागा वाटपावरून महायुतीत मोठा तिढा निर्माण झाला आहे. या मतदारसंघातून गत वर्षी अपक्ष आमदार निवडून आल्या आहेत. ही जागा आपली असल्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. शिवसेना शिंदे गटाने ही जागा लढवण्याची इच्छा व्यक्तकेली आहे. त्यामुळे महायुतीतील दोन्ही पक्षांकडून अनेक जण इच्छुक आहेत. याच कारणास्तव जागावाटप अद्याप रखडल्याचे बोलले जात आहे. असे असतानाच भाजपाकडून भाईंदर पश्चिमेला रविवारी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ४५ हुन अधिक माजी नगरसेवक, पक्षातील वरिष्ठ पदाधिकारी व हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी महापौर निर्मला सावळे यांनी यावेळी भाजप प्रवेशदेखील केला. भाजपला पुढे करून प्रमुख इच्छुकांपैकी एक असणाऱ्या मेहतांकडून हा मेळावा आयोजित करण्यात आल्याचे म्हटले जातआहे. मेळाव्याला उपस्थित माजी नगरसेवक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी, मेहता यांना भाजपकडून विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळायला हवी. तसेच त्यांना साथ देऊ, अशी सामूहिक घोषणा करीत तशी शपथ त्यांनी घेतली.

हा मेळावा महायुतीमधून तिकिटासाठी इच्छुक असणाऱ्यांना इतरांना ,विरोधी पक्षाला व भाजप पक्षश्रेष्ठींना आपली ताकद दाखवण्यासाठी मेहता यांच्याकडून आयोजित करण्यात आल्याच्याही चर्चा रंगल्या आहेत. यावेळी मेहता यांनी, त्यांना उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच शहरात कोणती विकासकामे केली जाणार आहेतयाचा वचननामादेखील वाचून दाखवला. तसेच मागील पाच वर्षांत शहराच्या रखडलेल्या विकासाला गती देण्यासाठी आपल्याला साथ देण्याची विनंती देखील त्यांनी केली.



### त्या वचनांचे काय झाले?

आमदार गीता जैन यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवेळी विकास कामांसंदर्भात नऊ वचने दिली होती. यातील एकही वचन पूर्ण झालेले नाही. त्यांनी केवळ पोकळ घोषणा दिल्या आहेत. त्यांच्या वचनाचे काय झाले? असा सवाल मेहता यांनी उपस्थित केला. काही लोक मी विकासाचा मुद्दा उपस्थित केला की केवळ मला वैयक्तिकरित्या बदनाम करण्याचा प्रयत्न करतात, असेदेखील सांगत मेहता यांनी नाव न घेता एका नेत्यावर निशाण साधला.

N.B.T. पान क्र. 5

# मीरा-भाईंदर सीट पर BJP-शिंदे शिवसेना में फंसा पेच

## महायुती के दोनों दलों में टकराव की स्थिति, बिगड़ सकता है BJP का गणित

■ अमित तिवारी, मीरा–भाईंदर

मीरा–भाईदर विधानसभा सीट पर जहां महा विकास आघाडी की तरफ से मुजफ्फर हुसैन की उम्मीदवारी लगभग तय है, तो वहीं महायुति में बीजेपी–शिवसेना(शिंदे) के बीच अभी भी दावेदारी को लेकर रस्साकसी जारी है। दोनों पार्टियां इस सीट पर अपनी दावेदारी छोड़ने को तैयार नहीं है। विश्वस्त सूत्रों की मानें तो बीजेपी इस सीट को किसी भी सूरत में तैयार नहीं है, तो वहीं एकनाथ शिंदे भी अपना उम्मीदवार चाहते हैं। हालांकि वे बीजेपी के चिह्न पर भी अपना उम्मीदवार उतारने को तैयार हैं।




**क्या है मीरा-भाईदर विधानसभा सीट का गणितः** राजनीतिक जानकारों के अनुसार, बीजेपी यह सीट किसी भी कीमत पर नहीं छोड़ना चाहेगी, जबकि शिंदे शिवसेना भी इस सीट पर अपनी नजरें गड़ाए हुए है। इससे दोनों पार्टियों के बीच इस सीट का पेच फंसा हुआ नजर आ रहा है। इस सीट पर पांच लाख से अधिक मतदाता हैं। आंकड़ों के मुताबिक, मीरा–भाईदर में हिंदी भाषी खास तौर पर गुजराती, मारवाड़ी, जैन और उत्तर भारतीय मतदाताओं का बाहुल्य है। इसके कारण बीजेपी का इस सीट पर दबदबा है। लेकिन, विगत विधानसभा चुनाव में निर्दलीय विधायक गीता जैन ने जीत हासिल की थी।

जैन उन नेताओं में शामिल रही हैं, जो शिवसेना में बगावत के बाद एकनाथ शिंदे के साथ गुवाहाटी पहुंची थी। शिंदे ने जैन को फिर से विधानसभा 'पहुंचाने' का आश्वासन दिया है।

### CM और DCM चाहते हैं अपनी पार्टी के उम्मीदवार



File Pics

### ...तो बिगड़ सकता का बीजेपी का गणित

मीरा–भाईंदर शहर के अंतर्गत दो सीटों में से ओवला माजीवाडा में शिवसेना के प्रताप सरनाईक विधायक हैं। ऐसे में मीरा–भाईंदर विधानसभा से शिवसेना का विधायक एमबीएमसी में बीजेपी का भविष्य और गणित बिगाड़ सकता है। विगत मनपा महासभा में लगभग दो तिहाई नगरसेवक बीजेपी के जीते थे। इसी कारण बीजेपी किसी भी सूरत में यह सीट छोड़ने को तैयार नहीं है। बीजेपी द्वारा सीट छोड़ने की स्थिति में स्थानीय कार्यकर्ताओं की नाराजगी भी पार्टी को विधानसभा चुनाव में नुकसान पहुंचा सकती है।

### फडणवीस और शिंदे में किसकी होगी जीत!

कुल मिलाकर सारा गणित उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस और मुख्यमंत्री एकनाथ शिंदे के बीच अटका हुआ है। शिंदे जहा बीजेपी के चुनाव चिह्न पर भी अपना उम्मीदवार लड़ाने को तैयार है, तो वही फडणवीस बीजेपी से ही कोई उम्मीदवार चाहते है। विश्वस्त सूत्रों की माने, तो रविवार को बीजेपी ने जो 'संकल्प सभा' निकाली थी, उसे बीजेपी आलाकमान का समर्थन प्राप्त था। 'संकल्प सभा' के माध्यम से बीजेपी अब दबाव तंत्र का इस्तेमाल कर रही है। देखना होगा कि फडणवीस और शिंदे मे से कौन अपनी बात मनवाने मे कामयाब होता है।

### किसे मिलेगा टिकट, किसका गिरेगा विकेट

महायुति से टिकट के लिए बीजेपी से पूर्व विधायक नरेंद्र मेहता और पूर्व जिलाध्यक्ष रवि व्यास कतार मे है, तो वही शिवसेना से विधायक गीता जैन और शिवसेना विधानसभा प्रभारी विक्रम प्रताप सिंह भी कतार मे है। गौरतलब है गीता जैन तो बीजेपी के टिकट पर भी चुनाव लड़ने को तैयार है।

Scanned with OKEN Scanner

नवभारत पृ. पान क्र. 5

# MBMC मार्केट पर ठेकेदारों का कब्जा

## मनपा राजस्व को नुकसान, ठेकेदार हो रहे मालामाल, पूर्व नगरसेविका सोन्स ने लगाए गंभीर आरोप

### 7 मार्केट का किया था निर्माण

■ विनोद मिश्रा @ नवभारत.

भाईंदर. मीरा-भाईंदर शहर में सड़कों पर बैठने वाले फेरीवालों और उनकी वजह से होने वाली ट्रैफिक जाम की समस्या से निजात पाने के लिए मनपा प्रशासन ने बीओटी ( बिल्ट, ऑपरेट, ट्रान्सफर ) के आधार पर शहर के अलग अलग क्षेत्रों में 7 मार्केट का निर्माण किया था. पूर्व नगरसेविका नीला सोंस ने आरोप लगाया है कि टीन के पतरे से बनाए गए इन मार्केट की लागत प्रति मार्केट 25 लाख रुपए निर्धारित की गई थी. साथ ही इस लागत के भुगतान के लिए 5 वर्षों तक बाजार शुल्क वसूली का ठेका मार्केट बनाने वाले अमर सिंह जाधव और विजय सोमानी नाम के 2 ठेकेदारों को दिया गया था. सोंस के अनुसार इन दो ठेकेदारों में से अमर सिंह जाधव नामक ठेकेदार की मृत्यु हो चुकी है और दूसरे ठेकेदार विजय सोमानी को मनपा ने ब्लैक लिस्ट घोषित किया था.





*मैंने मनपा आयुक्त संजय श्रीपतराव काटकर को लिखित जानकारी दी है कि मनपा मार्केट से ठेकेदारों द्वारा बाजार वसूली किए जाने से मनपा के राजस्व को भारी नुकसान हो रहा है. बीओटी के 5 वर्ष पूर्ण होने के बाद भी मनपा प्रशासन ने मार्केट को अपने कब्जे में नहीं लिया है. स्थानीय जनप्रतिनिधियों ने ठेकेदार के माध्यम से खुद की झोली भरने के लिए भ्रष्टाचार को नियोजित तरीके से अंजाम दिया है. सत्ता में रहते हुए मैंने हमेशा गलत नीतियों के खिलाफ आवाज उठाया है और अब जनहित के लिए ऐसे स्कैम के मुद्दे लेकर मैं जनता के बीच आती रहूंगी*

*- नीला सोन्स, पूर्व नगरसेविका*

### नियमों को ताक पर रख बढ़ाई गई अवधि

इसके बावजूद नियमों को ताक पर रख कर सितंबर 2023 में 5 वर्षों के लिए इन्हीं दोनों ठेकेदारों को बाजार वसूली की समय सीमा बढ़ा कर दे दी गयी है. मृत व्यक्ति और ब्लैक लिस्ट किए हुए ठेकेदार को ठेके की मुद्दत बढ़ा कर दिए जाने पर आश्चर्य व्यक्त किया जा रहा है. वहीं फेरीवालों की वजह से होने वाले ट्रैफिक जाम की समस्या भी ज्यों की त्यों बनी हुई है.

### सड़क पर धंधा करने वालों से सालाना 11 करोड़ की वसूली

- मीरा-भाईंदर शहर में सड़कों पर फेरी का धंधा लगाने वालों से बाजार वसूली का ठेका 60 रुपए से 90 रुपए प्रति ठेला, प्रति दिन के अनुसार 50 प्रतिशत बढ़ा कर हाल ही में मेसर्स ओडिसी प्रोटेक्टिव प्राइवेट लिमिटेड कंपनी को सालाना 11 करोड़ रुपए में 3 वर्ष के लिए 33 करोड़ रुपए में दिया गया है.
- मनपा मार्केट में फेरी लगाने वाले 590 फेरीवालों से वार्षिक 3 लाख 26 हजार 958 रुपए ठेकेदार मनपा को अदा कर रहे, जो कि प्रति ठेला वार्षिक भाड़ा औसतन मात्र 555 रुपए होता है. जबकि सड़क पर फेरी लगाने वाले प्रति फेरीवालों से प्रतिदिन 90 रुपए के हिसाब से वार्षिक भाड़ा औसतन 32 हजार 400 रुपए होता है. अधिक बाजार शुल्क अदा करने वाले फेरीवाले सुरक्षित भी नहीं रहते, आए दिन मनपा की कार्रवाई और नुकसान भी उन्हें झेलना पड़ता है.

Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal P. 6

# Show of strength by Ex-MLA for BJP ticket in twin-city

Suresh Golani
MIRA BHAYANDAR

Amidst the ongoing tug-of-war between three aspirants over securing BJP nomination for the Mira Bhayandar (145) assembly constituency, former legislator Narendra Mehta organised a Sankalp Sabha in Bhayandar on Sunday. It was apparently a last-ditch attempt by Mehta to mount pressure on the party top brass to show the clout he holds amongst the cadre and local voters. At the gathering, former MBMC mayor Nirmala Savle quit the Congress party and joined the BJP.

Hundreds of grass root party workers, office bearers and around 61 former corporators in the Mira Bhayandar Municipal Corporation (MBMC) registered their presence in the gathering and pledged their support to Mehta. The former MLA said the development of the region had come to a standstill in the past five years and he will ensure that all lagging projects are fast-tracked again.

### Former MBMC mayor Nirmala Savle abandons Cong for BJP

Apart from Mehta, two others, including independent legislator Geeta Jain and former city chief advocate Ravi Vyas are entangled in a fierce competition by staking claim to BJP candidature.

Former mayor and an active politician since 1997, Mehta joined BJP in 2012 and was appointed as the party's city chief. After facing defeat in the 2009 assembly elections, Mehta made a comeback in 2014 by defeating his NCP rival. In 2019, he lost by a margin of 15, 526 votes to Geeta Jain, who fought as an independent after being denied a BJP ticket.

Jain, who went on to support the Mahayuti alliance, had accompanied the Eknath Shinde rebel faction to Assam in 2022.

# 12 spaces for firecracker stalls found

Suresh Golani
MIRA BHAYANDAR

The Mira Bhayandar Municipal Corporation (MBMC) has formulated a safety policy in context to mandating guidelines for sale of firecrackers at open grounds during Diwali. The civic administration identified 12 grounds across the twin-city, which can accommodate around 100 stalls where firecracker vendors can carry out their trading activities in a safer environment.

The designated spots include Netaji Subhash Chandra Bose Stadium, Royal Garden Ground (Bhayandar-west), Navghar Municipal School Ground, Jesal Park Chowpatty, Tendulkar Ground (Bhayandar-east), police commissionerate ground, open space near Seven Eleven School, Balasahaeb Thackeray ground, Sardar Vallabhbhai Patel Ground, Shanti Nagar (sector II and VI) ground and a private vacant plot in Mira village. "Stalls will be permitted only after cross-verifying safety measures, which are mandatory under the relevant sections of the Indian Explosive Act," said civic chief Sanjay Katkar.

Scanned with OKEN Scanner